लोकमत



पाटेघर, ता. सातारा येथे वणवा न लावण्याची शपथ घेताना वनपाल व ग्रामस्थ उपस्थित होते.

# वन्यजीव संरक्षण, वनसंवर्धनासाठी जनजागृतीपर गावागावांमध्ये बैठका

## वनविभागाचा पुढाकार : मानव, वन्यजीव संघर्ष कमी होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पेट्री :** वन्यजीव संरक्षण व वन संवर्धनासाठी वन विभागाकडून गावोगावी बैठकांमार्फत जनजागृती सुरू असून, ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. रोहोट परिमंडळातील अनेक गावागावातून होत असणाऱ्या बैठकांना ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

रात्रगस्त, अवैध शिकार, वन्यजीव संरक्षण व वन संवर्धनात लोकसहभाग, कास पठार-वजराई भांबवली धबधबा पर्यटन वाढीसाठी प्रयत्न, पर्यटनस्थळांविषयींची मार्गदर्शक पुस्तके, जंगलाचे संरक्षण व संवर्धन, जलमृदा संधारण, गॅबियन बंधारे, माती बंधारे, पाणवठे निर्मिती, पशुहानी नुकसान भरपाई, बिबट-अस्वल हिंस्र प्राण्यांपासून संरक्षण, वणवा आदी विषयांबाबत रोहोट परिमंडळातील सर्व सरपंच, पोलिस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, वनरक्षक, वनपाल यांची मासिक बैठक तसेच गावांच्या साप्ताहिक बैठका नियमित होऊन ग्रामसभेदरम्यान लोकांना वनाविषयी व वन्यजीवाविषयी प्रबोधन व जनजागृती केली जात आहे. ग्रामस्थांच्या सोयीनुसार दिवसा अथवा रात्री रोहोट परिमंडळातील गावच्या साप्ताहिक सभा तसेच सर्व सरपंच, पोलिस पाटील, संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या नियमित बैठका होत असल्याने शासकीय योजना तसेच तलाठी, कृषी सहायक, वनविभाग घटनास्थळी पंचनामे करून नुकसान भरपाईची प्रक्रिया करत असल्याने पशुहानी नुकसान भरपाईसाठी ग्रामस्थांचा वेळ, खर्च वाचण्यास मदत होत आहे. नियमित मासिक, साप्ताहिक बैठका होत असल्याने ग्रामस्थ व वन विभागाचे कर्मचारी यांमध्ये समन्वय निर्माण होऊन विविध कामांबाबत सुसूत्रता येत असल्याचे कातवडी, ता. सातारा येथील सरपंच दीपक देवरे यांनी सांगितले.

### वनविभागाचे काम कौतुकस्पद..

रोहोट परिमंडळातील रोहोट, धावली, खडगाव बिटांतर्गत १९ गावे, तसेच यामध्ये १३ संयुक्त वन व्यवस्थापन समिती आहेत. रोहोट, आटाळी, सावली, अरगडवाडी, कुडेघर, दहीवड, पाटेघर, धावली, आलवडी, भांबवली, ताकवली, कातवडी, नावली, वेणेखोल, कासाणी, वडगाव, कुरूळ बाजी, कुरूळ तिजाई, दिगावळे आदी गावे येत असून वनक्षेत्रपाल डॉ. निवृत्ती चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल राजाराम काशीद, वनरक्षक सुनील शेलार नियमित बैठका घेऊन गावागावात जनजागृतीचे करत असलेले काम कौतुकास्पद आहे, असे ग्रामस्थांनी मत व्यक्त केले.

नियमित बैठकांमुळे लोकसहभाग वाढून मानव व वन्यजीव संघर्ष कमी होण्यास मदत झाली. वणवामुक्त जनजागृती करत गाव बैठकांमधून वणवा मुक्तीची शपथ घेतली जात आहे.

**- राजाराम काशीद,**
वनपाल, रोहोट